# पोलीस प्रशिक्षणार्थी करिता शिस्त व वर्तणुक विषयक सूचना

पोलीस प्रशिक्षण केंद्र मरोळ, मुंबई येथे मुलभूत प्रशिक्षण घेत असलेल्या नवप्रविष्ठ पोलीस प्रशिक्षणार्थी यांनी खालील नमूद सूचनांचे पालन करावे अन्यथा त्यांना कसूरदार समजण्यात येईल याची प्रशिक्षणार्थीनी नोंद घ्यावी.

## वस्तीगृहातील वर्तणुक व स्वच्छतेबाबत सूचना

१. सर्व प्रशिक्षणार्थी यांनी त्यांना नेमून दिलेल्या वस्तीगृहातील खोलीत रहाणे आवश्यक आहे. स्वतःचे मर्जीने इतर वस्तीगृह खोलीत जावून रहाता कामा नये. आपण राहत असलेल्या वस्तीगृहात तसेच रुम मध्ये कोणत्याही प्रकारे अस्वच्छता होणार नाही, तसेच खोलीमधील ट्युबलाईट, फॅन, नळ, सरकारी सरंजाम याचे नुकसान होणार नाही याची काळजी/दक्षता घ्यावी.

२. नैसर्गिक विधी व स्नानाकरिता स्नानगृह व शौचालय याचाच वापर करावा. स्वच्छतागृहात मोठयाने गाणे गाणे, ओरडणे, गोंधळ करणे असे बेशिस्तपणाचे वर्तन करू नये.

३. प्रशिक्षणार्थी यांनी वसतीगृहातील विजेचे दिवे, पंखे यांचा गरजेनुसार उपयोग करावा, तसेच वसतीगृहाबाहेर पडताना आपापले खोली कक्षातील सर्व विदयुत उपकरणे बंद करावीत. वस्तीगृह रुममध्ये रात्री २२:०० वा. नंतर दिवे चालू राहणार नाहीत व ध्वनिप्रदुषण होणार नाही याची काळजी घ्यावी.

४. वस्तीगृहात रहाताना कोणत्याही प्रकारचे मद्यपान, गुटखा, बिडी, सिगारेट इ. चे नशापान प्रशिक्षणार्थी यांनी करता कामा नये. केल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

५. प्रशिक्षणार्थी यांनी खोली बॅरैक मध्ये तेलाचा दिवा, अगरबत्ती, शेगडी, स्टोव्ह, हीटर, इस्त्री, गिजर, इंडक्शन यासारखे इलेक्टॉनिक्स साधने ज्वलनशील वस्तू यांचा वापर करता कामा नये.

६. वस्तीगृह व वस्तीगृह परिसर स्वच्छ ठेवावा तसेच वस्तीगृहात शरीरास अपायकारक आक्षेपार्ह वस्तू ठेवण्यात येऊ नयेत. वस्तीगृहाची अचानक तपासणी करण्यात येईल अशावेळी आक्षेपार्ह वस्तू आढळल्यास संबंधितावर कठोर कारवाई करण्यात येईल.

७. वस्तीगृह इमारतीच्या टेरेसवर विनाकारण कोणीही जाणार नाही. वस्तीगृह परिसरामध्ये नेमून दिलेल्या गणवेशामध्येच वावरतील.

## <u>भोजनालया संबंधी सूचना</u>

१. प्रशिक्षणार्थी यांनी दिलेल्या वेळेतच भोजनालयात नाष्टा व जेवण करावे.

२. भोजनालयात जेवण्यास/नाष्टयास जात असतांना संपूर्ण पी.टी. गणवेश व कॅनव्हास शुज परिधान करावा.

३. अन्नपदार्थ रांगेत उभे राहुनच घ्यावे व वाढून घेतलेले अन्नपदार्थ खाली सांडू नये. भोजनालय/मेस कर्मचारी यांचेशी तसेच आपापसात वादविवाद करु नये.

४. जेवणाचे खरकटे कचरापेटीत टाकावे, आवश्यक तेवढेच अन्न घ्यावे. अन्न वाया घालवू नये.

५. रजेवर जाणाऱ्या प्रशिक्षणार्थी यांनी रजेवर जाण्यापुर्वी भोजनालय व्यवस्थापन समितीस तशी पूर्वसूचना देणे आवश्यक आहे. शाकाहारी/मांसाहारी असलेबाबत वेळेत संबंधितांना माहिती दयावी.

६. भोजनालया संदर्भात काही तक्रार/सूचना असल्यास भोजनालय प्रमुख यांना सांगाव्यात अथवा अभिप्राय

नोंदवहीत तक्रारीची नोंद करावी किंवा तक्रारपेटीचा वापर करावा.

७. भोजनालयात प्रशिक्षणार्थी यांचेकडून कोणत्याही साहीत्याचे नुकसान झाल्यास सर्वस्वी जबाबदारी
संबंधित प्रशिक्षणार्थी यांची राहील.

८. भोजनालयात मोठयाने गाणे गाणे, ओरडणे, गोंधळ करणे असे बेशिस्तपणाचे वर्तन करू नये.

## आंतरवर्ग प्रशिक्षण संबंधाने सूचना

१. प्रशिक्षणार्थी यांनी आंतरवर्ग वर्गामध्ये येताना स्वच्छ गणवेश परिधान करावा.

२. वेळापत्रकाप्रमाणे त्या त्या विषयांची क्रमिक पुस्तके वर्गामध्ये येतांना आणणे हे अपेक्षित आहे. मात्र तांत्रिक कारणास्तव विषय बदलू शकतो, त्यामुळे शक्यतो सर्व विषयांची पुस्तके सोबत ठेवावी.

३. आंतरवर्गातील वर्गनायक हे वर्गातील प्रशिक्षणार्थी यांची हजेरी घेतील तसेच वर्गातील टि.व्ही. स्क्रीन, लॅपटॉप, रिमोर्ट, किबोर्ड, माऊस चालू स्थितीत असल्याबाबत खातरजमा करतील याबाबत जवाबदारी वर्गनायक यांची राहील. वर्ग संपताच ती यंत्रणा व वर्गातील ट्युबलईट, फॅन बंद करावे.

४. वरिष्ठांचे आगमन क्लासमध्ये होताच योग्य ती मानवंदना दयावी.

५. वर्गनायक यांनी योग्य तो उपस्थिती अहवाल द्यावा.

६. आंतरवर्गामध्ये मासिके, वर्तमानपत्र, मोबाईल फोन आणू नयेत.

७. आंतरवर्गामध्ये तासिका चालू असताना कोणीही प्रशिक्षणार्थी झोपणार नाही.

८. आंतरवर्ग चालू असताना विषय शिकवणारे प्रशिक्षक जर वर्गात आले नसतील तर वर्गनायक यांनी आंतरवर्ग प्रमुख यांचेशी संपर्क साधुन पर्यायी व्यवस्था करावी. आंतरवर्गात प्रशिक्षक नसताना कोणत्याही प्रकारचे बेशिस्त वर्तन, गोंधळ होणार नाही याची दक्षता घ्यावी.

९. आंतरवर्गामधील मध्यांतरामध्ये प्रशिक्षणार्थी हे शिस्तीने वर्गाच्या बाहेर पडतील व मध्यांतर संपताच पुन्हा वेळेत आपल्या वर्गात शिस्तीने येवुन बसतील.

१०. मध्यांतरात प्रशिक्षणार्थी हे प्रशिक्षण केंद्राचा परिसर सोडून कोठेही बाहेर जाणार नाहीत.

११. आंतरवर्ग व नालंदा इमारत परिसर स्वच्छ राहील याची दक्षता प्रशिक्षणार्थी यांनी घ्यावी.

१२. आंतरवर्ग वर्गाबाहेर नेमलेले बाहयवर्ग प्रशिक्षक हे प्रशिक्षणार्थी यांचे स्कॉड तयार करून वसतीगृहापर्यंत मार्च करून नेयाची जबाबदारी वर्गनायक यांची राहील.

१३. आंतरवर्गामध्ये तासिका चालू असताना कोणीही प्रशिक्षणार्थी कोणताही खाद्‌य पदार्थ खाणार नाही.

१४. नालंदा येथील प्रसाधन गृहामध्ये मदयपान, गुटखा, बिडी, सिगारेट इ. चे नशापान प्रशिक्षणार्थी यांनी करता कामा नये. केल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

## प्रशिक्षणार्थी यांना परीक्षेबाबत सूचना

१. प्रशिक्षणार्थी यांनी पेपर क्र.१ ते ३ पुस्तकासह या परीक्षेच्या वेळी त्यांना देण्यात आलेली बेअर ॲक्ट पुस्तके परीक्षेकरीता आणावीत. त्या व्यतिरिक्त इतर कोणतेही पुस्तक वर्गात घेवून जाण्यास मनाई आहे.

२. परीक्षा कालावधीमध्ये प्रशिक्षणार्थी यांची फिस्कींग / तपासणी केल्याशिवाय परीक्षा कक्षात प्रवेश दिला जाणार नाही.

३. प्रशिक्षणार्थी यांनी त्यांचे सोबत फक्त पेपर लिहण्याकरीता पेन, फुटपट्टी, पेन्सील, लिखाणाकरीता

पारदर्शक पॅड या व्यतिरिक्त कोणतेही साहित्य बरोबर ठेवू नये.

४. प्रशिक्षणार्थी हे परीक्षे दरम्यान वर्गामध्ये कॉपीचे प्रकार, आपसात बोलणे व इतर गैरप्रकार करणार नाहीत. असे प्रकार निदर्शनास आल्यास त्यावर कठोर कायदेशिर कारवाई करण्यात येईल.

५. प्रशिक्षणार्थी यांना परीक्षा केंद्रात इलेक्ट्रॉनिक उपकरणे किंवा मोबाईल फोनसह इतर कोणतेही साहित्य घेऊन जाण्याची परवानगी नाही.

६. प्रशिक्षणार्थी यांनी उत्तर पत्रिका प्राप्त झाल्यानंतर त्यावर स्वतःचे नाव, रोल नंबर विषयाचे नाव व परीक्षा-वर्ग क्रमांक नमूद करावा तसेच आपल्याला नेमून दिलेल्या आसनावरच बसावे ते बदलू नये.

## बाह्यवर्ग प्रशिक्षणासंबंधाने सूचना

१. स्कॉड लिडर हे दररोज वसतिगृहातुन बाहयवर्ग प्रशिक्षणासाठी जाताना ठरवून दिलेल्या स्वच्छ गणवेशातच फॉल इन करून शिस्तबध्दरित्या मार्च करून आणतील व आपल्या कवायत निर्देशकांना रिपोर्ट करतील. स्कॉडच्या शिस्तीची जवाबदारी स्कॉडलिडर यांची राहील.

२. बाहयवर्ग सुरू होण्यापुर्वी जे प्रशिक्षणार्थी आजारी असतील ते त्यांच्या प्रशिक्षकासह मैदानावर हजर असलेल्या वरिष्ठ अधिकारी यांना रिपोर्ट करतील.

३. सर्व प्रशिक्षणार्थीनी व्यवस्थित दाढी केलेली, केसकर्तन केले, बुटांना पॉलिश केलेली, नखे काढलेली, स्वच्छ गणवेष असावा तसेच कोणीही प्रशिक्षणार्थी गळयात माळ, कपाळावर टिळा, हातात घड्याळ घालणार नाही.

४. प्रशिक्षणार्थी बाहयवर्ग प्रशिक्षणास येताना कोणतेही बाहयवर्ग प्रशिक्षण साहित्या व्यतिरिक्त इतर साहित्य आणणार नाहीत.उदा.मोबाईल, टॅब इ.

५. बाहयवर्ग प्रशिक्षणासाठी पोलीस प्रशिक्षण केंद्रातील शस्त्रगारातुन शस्त्र घेताना/जमा करताना तेथे गर्दी न करता शिस्तीने स्कॉडप्रमाणे एका रांगेत येतील.

६. प्रशिक्षणार्थी बाहयवर्ग चालू असताना शस्त्राबाबत निष्काळजीपणा करणार नाही. शस्त्राशी अनावश्यक छेडछाड करणार नाहीत, तसेच कवायतीसाठी लागणारे लॉग, मेडीसीन बॉल, इत्यादी पुरविण्यात आलेल्या साहित्याची योग्य ती काळजी घेतील. बाहयवर्ग संपल्यानंतर प्रशिक्षकांचे परवानगीशिवाय शस्त्र हाताळू नयेत. शस्त्राची निगा राखली जाईल याची काळजी घ्यावी

व आदेशाप्रमाणे शस्त्र स्वच्छ करावे. तसेच लॉग व मेडीसीन बॉल भांडरगृहात जमा करावे.

७. बाहयवर्ग प्रशिक्षण दरम्यान राखीव पोलीस निरिक्षक, सेक्टर इंचार्ज, कवायत निर्देशक व हजेरी मेजर यांनी दिलेला प्रत्येक आदेश हा प्राचार्य यांचे पुर्व मान्यतेने दिलेला आहे हे लक्षात ठेवावे. अशा कोणत्याही आदेशाची अवहेलना होणार नाही याची प्रत्येक प्रशिक्षणार्थी यांनी दक्षता घ्यावी.

८. मैदानावर तसेच प्रशिक्षण केंद्र परिसरात कागद, केरकचरा होणार नाही याची काळजी घेवुन स्वच्छता ठेवावी.

## <u>दवाखान्याबाबत सूचना</u>

१. पोलीस प्रशिक्षण केंद्र आवाराबाहेर असलेल्या शासकीय दवाखान्यात ठरवून दिलेल्या वेळेतच उपचारासाठी जावे. आंतरवर्ग किंवा बाहयवर्ग चालू असताना प्रशिक्षणार्थी यांची प्रकृती गंभीर असल्याशिवाय तसेच आंतरवर्ग प्रमुखाची कॅम्प अधिकारी यांची परवानगी घेतल्याशिवाय दवाखान्यात जाऊ नये.

२. प्रशिक्षणार्थी यांना जेव्हा रुग्णालयात दाखल केले जाईल तेव्हा सोबत एक काळजीवाहू (केअरटेकर) प्रशिक्षणार्थी नेमण्यात यावा.

३. वैदयकिय अधिकारी यांचे सल्ल्याने आजारी प्रशिक्षणार्थी यास उपचारासाठी अथवा औषधे आणण्यासाठी प्रशिक्षण केंद्राबाहेर जायचे असल्यास कॅम्प अधिकारी यांची पुर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील त्याबाबत ठाणे दैनंदिनीत नोंद करणे आवश्यक राहील.

४. दवाखान्यातील वैदयकिय अधिकारी व कर्मचारी यांचेशी वागताना नम्रपणे वागावे, विनाकारण वाद घालु नये.

५. वैदयकिय सल्याशिवाय इतर औषधे स्वतः घेवू नयेत.

## <u>व्यायामशाळेबाबत सूचना</u>

१. पोलीस प्रशिक्षण केंद्रातील व्यायामशाळेत जाताना पि.टी. गणवेषात दिलेल्या वेळेतच जावे.

२. व्यायामशाळेत प्रवेश कराताना व जाताना ठेवण्यात आलेल्या रजिस्टरमध्ये नोंद करावी.

३. व्यायामशाळेत आरडाओरड, गोधळ व बेशिस्त वर्तन करू नये.

४. व्यायामशाळेतील साहित्याची तोडफोड किंवा नुकसान करू नये त्याठिकाणी नेमण्यात आलेले निर्देशक यांचे मार्गदर्शनानुसार व्यायाम करावा

५. व्यायामशाळेत येताना कोणतीही मौल्यवान वस्तु, मोबाईल सोबत आणु नये.

## <u>वाचनालयाबाबत सूचना</u>

१. पोलीस प्रशिक्षण केंद्रातील वाचनालयात नेमुन दिलेल्या वेळेतच जावे.

२. वाचनालयामार्फत अभ्यासासाठी देण्यात आलेली पुस्तके काळजीपुर्वक हाताळावीत. पुस्तके फाटणार नाहीत. खराब होणार नाहीत तसेच विद्रुप होणार नाहीत याची काळजी घ्यावी पुस्तकांवर काहीही लिहू नये पुस्तकाचे नुकसान झाल्यास त्याची योग्य ती नुकसान भरपाई करून घेण्यात येईल.

३. वाचनालयातील कर्मचारी यांचेशी वाद न घालता सभ्यपणे वागावे.

४ वाचनालयामध्ये वाचन करताना शांतता ठेवावी इतरांना त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी.

५. वाचनालयातील टेबल, खुर्चा, पेपर तसचे इतर साहित्य सुस्थितीत ठेवावे.

# प्रशिक्षणार्थी यांना रविवारी प्रशिक्षण केंद्राबाहेर सोडण्याबाबतचे वेळापत्रक व कार्यपध्दती

१. रविवारी किरकोळ खरेदी व कामासाठी प्रशिक्षणार्थी यांना १०.०० ते १७.०० वाजेपावेतो वरिष्ठांचे आदेशान्वये प्रशिक्षण केंद्राबाहेर सोडण्यात येईल. त्यावेळी सर्व प्रशिक्षणार्थी परिपुर्ण शिस्तीचे पालन करतील. बाहेर गेल्यावर कोणीही गैरवर्तन करणार नाही.

२. रविवारी दुपारचे जेवण प्रशिक्षणार्थी हे प्रशिक्षण केंद्राबाहेर घेतील.

३. प्रशिक्षणार्थी यांना मुफ्ती ड्रेस (सफेद शर्ट व सफेद पॅट) मध्ये बाहेर सोडण्यात येईल कोणताही प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण केंद्राच्या बाहेर गेल्यानंतर

साध्या वेषात वावरणार नाही असा प्रशिक्षणार्थी मिळुन आल्यास त्याच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

४. प्रशिक्षणार्थींनी सुटीच्या दिवशी बाहेर गेल्यानंतर आपल्या आरोग्यास बाधा पोहोचेल असे अन्न व पेय सेवन करू नये.

५. प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण केंद्रात बाहेरून कोणतीही आक्षेपार्ह वस्तु व साहित्य आणण्यास मनाई आहे.

६. सुटीच्या दिवशी बाहेर सोडल्यानंतर कोणताही प्रशिक्षणार्थी परवानगीशिवाय मुख्यालयाचे शहर सोडुन इतर ठिकाणी जाणार नाही. वेळेपूर्वी रात्रीचे हजेरीला उपस्थित राहतील.

७. २६ जानेवारी, १ मे, १५ ऑगस्ट रविवार व वरिष्ठांकडुन कळविण्यात आलेल्या सुट्या व्यतिरिक्त इतर शासकीय सुटीच्या दिवशी नियमितपणे आंतरवर्ग व बाहयवर्ग प्रशिक्षणाचे वर्ग चालू राहतील.

## <u>नवप्रविष्ठ प्रशिक्षणार्थी संबंधाने सर्वसाधारण सूचना</u>

१. प्रशिक्षणार्थी यांनी प्रशिक्षण केंद्रात मोबाईलचा वापर करू नये. फक्त वसतीगृहात विश्रांतीच्या वेळी अत्यावश्यक कारणाकरीता मोबाईलचा इतरांना त्रास होणार नाही अशा पद्धतीने वापर करावा.

२. प्रशिक्षणार्थी यांचा अचानक चेक रोल कॉल घेतला जाईल चेक रोल कॉल करीता पीटी गणवेशात तात्काळ हजेरी मैदानात हजर होतील.

३. प्रशिक्षणार्थी यांना काही महत्वाच्या सूचना दयावयाच्या असतील तर त्या सूचना नोटीस बोर्डावर लावण्यात येतील म्हणून प्रशिक्षणार्थी यांनी दररोज नोटीस बोर्डावरील सूचना वाचाव्यात.

४. प्रशिक्षणार्थी यांनी प्राचार्य यांचे लेखी आदेशाशिवाय कोणत्याही कारणास्तव कोणालाही रोख रक्कम अथवा वस्तु देवु नये कोणीही आर्थिक रकमेची अथवा इतर स्वरूपाची मागणी केल्यास सदरची बाब विनाविलंब प्राचार्य याचे निदर्शनात आणुन दयावी.

५. पोलीस प्रशिक्षण केंद्रातील धोबी व न्हावी यांना कंत्राटी पध्दतीने नेमण्यात आलेले असल्याने प्रशिक्षणार्थी यांनी त्यांना परस्पर कोणत्याही प्रकारची रक्कम देवू नये.

६. आंतरवर्ग व बाहयवर्ग प्रशिक्षणात प्राचार्य यांचे लेखी परवानगीशिवाय गैरहजर राहणा-या व आजारी रजेवर जावुन आंतरवर्ग व बाहयवर्ग प्रशिक्षण टाळण्याचा प्रयत्न करणा-या प्रशिक्षणार्थी विरुध्द महाराष्ट्र पोलीस कायदा २५ प्रमाणे कारवाई करण्यात येईल.

७. पोलीस प्रशिक्षण केंद्र येथील कॅम्प परिसरात रात्रीचे वेळी फिरताना गस्त करताना नेहमी टॉर्च व लाठी सोबत असावी तसेच सरपटणारे प्राणी यांचेपासुन संरक्षण मिळणेसाठी पायात शुज व ॲक्लेट घालणे आवश्यक आहे.

८. पोलीस प्रशिक्षण केंद्र परीसरामध्ये किंवा बाहेर फिरतांना दोन जवान जात असतील तर त्यांचा कदम मिळालेला पाहिजे. परीसरात येतांना जातांना कोणीही

वरीष्ठ उभे असतील तेव्हा दहिने बायें सॅलुट (मानवंदना) करावे.

९. तक्रारपेटीमध्ये स्वतःचे नावे किंवा स्वाक्षरी नमुद करून किंवा न करता तक्रार / सूचना / अभिप्राय तकार पेटीमध्ये टाकाव्यात.

१०. वेळोवेळी वरिष्ठांचे जारी झालेल्या आदेशाचे पालन करतील.

११. रविवारच्या अधिकृत कॅम्प आऊट शिवाय इतर दिवशी कोणीही कॅम्पच्या बाहेर जाणार नाही.

१२. प्रशिक्षणार्थी यांनी नातेवाईक यांना भेटण्यासाठी बोलावु नये, अत्यावश्यक वेळी नातेवाईक आल्यास त्यांना मुख्य प्रवेशव्दारा जवळील चौकीत भेटता येईल

१३. बाहेरील अन्नपदार्थ ऑनलाईन पध्दतीने किंवा इतर प्रकारे मागवण्यास सक्त मनाई आहे

१४. मेस कपातीची रक्कम भरण्याची सूचना मिळताच दिलेल्या मुदतीत रक्कम भरावी.

१५. रजा मागणीची कारणे खोटी असल्याचे निष्पन्न झाल्यास कठोर शिस्तभंगाची कार्यवाही, सेवासमाप्ती, बडतर्फ पावेतो करण्यात येईल.

१६. विनापरवाना गैरहजर राहिल्यास विनावेतन करण्यात येऊन शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल. दोन

दिवसांपेक्षा जास्त कालावधीसाठी विनापरवाना गैरहजर राहिल्यास शिस्तभंगाची, सेवेतून बडतर्फ होईपर्यंत कारवाई करण्यात येईल.

१७. रुग्णनिवेदन केलेला प्रशिक्षणार्थी वीस दिवसापेक्षा जास्त काळ आंतरवर्ग व बाहयवर्ग प्रशिक्षणापासून वंचित राहिल्यास त्याला मुळ घटकात परत पाठविण्यात येईल.

१८. पोलीस प्रशिक्षण नियमावलीत नमूद केलेले नियम व त्यातील सुचनांव्यतिरिक्त प्राचार्य यांचेकडून निर्गमित होणाऱ्या सर्व सूचना व आदेशांचे काटेकोरपणे पालन करणे सर्व प्रशिक्षणार्थी यांचेवर बंधनकारक राहील.

१९. प्रशिक्षणादरम्यान प्रशिक्षणार्थी स्वतः सोबत मौल्यवान वस्तू उदा. सोन्या चांदीचे दागदागिने ठेवू नयेत.

२०. संगणक कक्षामध्ये प्रवेश करताना प्रशिक्षणार्थी परवानगी घेवूनच प्रवेश करतील व संगणकावर बसताना तसेच प्रिंटआऊट काढताना संगणक कक्षातील अधिकारी /अंमलदार यांची परवानगी घेतील.

**<u>जे प्रशिक्षणार्थी सूचना, नियम तसेच शिस्तीची काटेकोरपणे अंमलबजावणी व पालन करणार नाहीत अशा प्रशिक्षणार्थी यांचे विरूध्द</u>**

१. महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९ प्रशासन, भाग-१ प्रकरण १२ वर्तणुक व अपिल, शिस्त नियम क्रमांक ४१९ (१)(२)(३).

२. महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५९ मधील नियम क्रमांक २५ (१)(ख).

३. महाराष्ट्र पोलीस (शिक्षाच व अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ व उप नियम (अ-३) मधील (१-अ)(फ)(ब).

४. महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९७९ अन्वये कारवाई करण्यात येईल.